९) शैक्षणिक वर्षाच्या अगदी प्रारंभी आणि शक्यतर शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यापसुन एका आठवडयात विषयवार आणि वर्गवार वार्षीक घटकयोजना तयार करील.

१०) आपला अध्यापन कार्यक्रम तयार करील आणि खाली दर्शविल्याप्रमाणे त्याची अतिशय संक्षीप्तात नोंद ठेवील. आणि इतर अभिलेख बिनचुक व्यवस्थित ठेवण्यास तो जबाबदार असेल. आणि इतर अभिलेख बिनचुक व्यवस्थित ठेवण्यास तो जबाबदार असेल.

अ) (एक) तारीख (दोन) वर्ग (तीन) विषय.

ब) अध्यापनाच्या कालावधीतमध्ये शिकवावयाचा घटक.

क) अभ्यास विषयाच्या स्वरूपावर अवलंबुन ज्याच्यावर जोर देणे आवश्यक आहे असे शब्द.

ड) अध्यापणाची साधणे किंवा प्रयोग कोणतीही असल्यास.

इ) लिखणाचे काम पठण, ठळक वाचण यासारख्या गृहपाठाचे स्वरूप.

११) विशेषतः भुगोल, इतिहास, विज्ञान, गणित, वाड्मय इत्यादी सारख्या विषयावरील घटक सादर करतांना महाविद्यालयातील उपलब्ध असलेल्या अध्यापन/ अध्ययन सामग्रीचा वापर करील. विज्ञान शिक्षक विहीत अभ्यासक्रमावर हुकुम प्रयोग करून दाखविल आणि विद्यार्थ्यांकडुन सर्व प्रात्याक्षिकाची कामे करून घेईल.

१२) कामाच्या आखलेल्या प्रत्यक्ष आराखड्याप्रमाणे काम करील आणि त्यात कोणत्याही त्रुटी राहील्यास प्रत्यक महिन्याच्या अखेरीस संबधीत वर्गाच्या मासिक नोंदवहीत त्याबाबतची कारणे नमुद करील आणि संबधीत प्राचार्यास यांच्याशी विचार विनीमय करून असलेल्या त्रुटी किंवा उणीवा दुर करण्यासाठी उपाय योजील.

१३) दिशानिदेशन पाठ्यक्रम शिकुन घेईन आणि तो यशस्वीपणे पुर्ण करील.

१४) कामाच्या आणि उपस्थितीच्या विहित वेळामध्ये प्राचार्य त्यास शिक्षण संबधाने सांगेल अशी इतर कामे करील आणि त्या संबधीत तो देईल त्या सुचनांचे पालन करील.